RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४३] गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.—मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश .. .. .. .. .. .. पृष्ठे १-५

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० मार्च २०११.

MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2011.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY LOCAL FUND AUDIT ACT, 1930.

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.

**मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

त्याअर्थी, आता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या पूर्ण शिर्षकाची सुधारणा.

२. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या पूर्ण शिर्षकामधील " बृहन्मुंबई व्यतिरिक्त " हा मजकूर वगळण्यात येईल. १९३० चा मुंबई २५

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या हेतु वाक्याची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या हेतु वाक्यामधील " बृहन्मुंबई व्यतिरिक्त " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १ मधील, " मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० " या मजकुराऐवजी " महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मधील " बृहन्मुंबई व्यतिरिक्त " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, " मुख्य लेखापरीक्षक " या मजकुराऐवजी " संचालक " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (अ) मध्ये, " नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत त्या शहराचा नगरपालिका आयुक्त, " या मजकुराऐवजी, " महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींच्या बाबतीत, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ या अन्वये घटित झालेल्या संबंधित नगरपरिषदा किंवा यथास्थिती, नगरपंचायतींचा मुख्य अधिकारी आणि औद्योगिक नगरींच्या बाबतीत संबंधित औद्योगिक नगरीचा मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ; १९६५ चा महा. ४०.

(तीन) खंड (अअअ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (अअअ) " संचालक " म्हणजे संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा असा असून त्यात सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, उप संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा आणि सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांचा समावेश होतो ; ";

(ख) पोट-कलम (२) मधील, " मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा किंवा यथास्थिती उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा " या मजकुराऐवजी " संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा किंवा यथास्थिती, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

७. संपूर्ण मुख्य अधिनियमामध्ये, समासटीपेसह " मुख्य लेखापरीक्षक " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल, त्या त्या ठिकाणी, " संचालक " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल. सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ मध्ये " मुख्य लेखापरिक्षक " या मजकुराऐवजी " संचालक " हा मजकूर दाखल करणे.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट-कलम (१) मध्ये, " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी " पंचवीस हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,— सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(क) " मुख्य लेखापरीक्षकाने आपल्या अहवालात पुढील गोष्टीसंबंधीचे एक विवरणपत्र समाविष्ट केले पाहिजे.— " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" संचालकाने आपल्या अहवालात पुढील गोष्टींसंबंधीचे एक विवरणपत्र समाविष्ट केले पाहिजे—

भाग-१-गंभीर अनियमितता- ";

(ख) खंड (ब) मध्ये, " किंवा नुकसानीची रक्कम " या मजकुरानंतर, " ,कंत्राट देण्यामध्ये झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (क) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" भाग-२-इतर अनियमितता- ".

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील पोट-कलम (३) च्या दुसऱ्या परंतुकातील खंड सन १९३० चा

(दोन) एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांस,

असा दोष किंवा नियमबाह्य गोष्ट क्षमापित करणे आवश्यक आहे असे वाटल्यास ती क्षमापित करता येईल. तथापि, अशा क्षमापनानंतर, संबंधित अधिकाऱ्याने आपल्या अहवालामध्ये तशा आशयाची नोंद केली पाहीजे. ".

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) मध्ये, "इतर अधिकाऱ्यास कळविले पाहिजे" या मजकूरानंतर " उपरोक्त कार्यवाही, आयुक्त प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यात पूर्ण करील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (सन १९३० चा मुंबई २५) यामध्ये १३ व्या वित्त आयोग अहवालाच्या शिफारशीनुसार पुढीलप्रमाणे आवश्यक सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत :—

(क) अधिनियमाचे संक्षिप्त नाव "महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम" असे बदलणे ;

(ख) नागरी स्थानिक संस्थांच्या लेखापरीक्षा संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून करण्यात येईल, अशी तरतूद करणे ;

(ग) "मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा" यांच्या पदनामात "संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा" असा बदल करणे ;

(घ) अधिनियमाच्या कलम ७ मधील शास्तीच्या रकमेत शंभर रुपयांवरुन पंचवीस हजार रुपये इतकी वाढ करणे ;

(ङ) संचालक, त्यांच्या अहवालात अनियमिततांचे विवरणपत्राचा समावेश करतील अशी तरतूद करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ९ मध्ये सुधारणा करणे.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (१९३० चा मुंबई २५) यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ९ मार्च २०११.

के. शंकरनारायणन्,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश अग्रवाल,
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNIROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४५] शनिवार, मार्च १२, २०११/फाल्गुन २१, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक ९, भाग चार, दिनांक १० मार्च २०११ मध्ये, पृष्ठ क्रमांक १ ते ५ वर प्रकाशित करण्यात आलेल्या, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५) मध्ये,—

(१) पृष्ठ क्रमांक २ वर,—

(क) ओळ क्रमांक ८ मध्ये " शिर्षकामधील " या ऐवजी " शीर्षकामधील " असे वाचावे ;

(ख) कलम २ च्यां समासटिपेमध्ये " शिर्षकाची " या ऐवजी " शीर्षकाची " असे वाचावे ;

(ग) ओळ क्रमांक १३ मध्ये " मजकूराऐवजी " या ऐवजी " मजकुराऐवजी " असे वाचावे ;

(घ) ओळ क्रमांक १९ मध्ये " (अअ) " या ऐवजी " (अ) " असे वाचावे ;

(ङ) ओळ क्रमांक २१ मध्ये " (अ) " या ऐवजी " (अअ) " असे वाचावे ;

(२) पृष्ठ क्रमांक ३ वर,—

(क) ओळ क्रमांक ४ मध्ये " सहाय्यक " या ऐवजी " सहायक " असे वाचावे ;

(ख) ओळ क्रमांक ६ मध्ये " यथास्थिती " या ऐवजी " यथास्थिति " असे वाचावे ;

(ग) ओळ क्रमांक ८ मध्ये " यथास्थिती, सहाय्यक " या ऐवजी " यथास्थिति, सहायक " असे वाचावे ;

(घ) ओळ क्रमांक २९ मध्ये " सहाय्यक " या ऐवजी " सहायक " असे वाचावे ;

(३) पृष्ठ क्रमांक ४ वर, ओळ क्रमांक ७ मध्ये " पाहिजे या मजकूरानंतर " या ऐवजी " पाहिजे." या मजकुरानंतर" असे वाचावे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५९] गुरुवार, मार्च २०, २०११/फाल्गुन २९, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम, व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. V of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

[Translation in English of the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. V of 2011), published under the authority of the Governor].

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th March 2011.

**MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2011.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930, for the purposes hereinafter appearing ;

Bom. XXV of 1930.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of Article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title, and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of long title of Bom. XXV of 1930.

2. In the long title of the Bombay Local Fund Audit Act, 1930 (hereinafter referred to as " the principal Act "), the words " except Greater Bombay " shall be deleted. Bom. XXV of 1930.

Amendment of preamble of Bom. XXV of 1930.

3. In the preamble of the principal Act, the words ", except Greater Bombay " shall be deleted.

Amendment of section 1 of Bom. XXV of 1930.

4. In section 1 of the principal Act, for the words and figures " Bombay Local Fund Audit Act, 1930 " the words " Maharashtra Local Fund Audit Act " shall be substituted.

Amendment of section 2 of Bom. XXV of 1930.

5. In section 2 of the principal Act, the words ", except Greater Bombay " shall be deleted.

Amendment of section 3 of Bom. XXV of 1930.

6. In section 3 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*1*),—

(*i*) in clause (*a*), for the words " Chief Auditor " the word " Director " shall be substituted ;

(*ii*) in clause (*aa*), for the words " the Municipal Corporation of the City of Nagpur, the Municipal Commissioner for that City, " the following shall be substituted, namely :—

" a Municipal Corporation the Municipal Commissioner of the concerned Corporation, and in case of the Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships constituted under the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, the Chief Officer of the respective Municipal Council or *Nagar Panchayats* as the case may be, and in respect of the Industrial Townships, the Chief Executive Officer of the respective Industrial Township,"; Mah. XL of 1965.

(*iii*) for clause (*aaa*), the following clause shall be substituted, namely :—

"(*aaa*) "Director" means the Director, Local Fund Accounts Audit and includes the Joint Director, Local Fund Accounts Audit, the Deputy Director, Local Fund Accounts Audit and the Assistant Director, Local Fund Accounts Audit ;";

(*b*) in sub-section (2), for the words, "Chief Auditor, Local Fund Accounts or, as the case may be, the Deputy Chief Auditor, Local Fund Accounts", the following words shall be substituted, namely :—

"Director, Local Fund Accounts Audit, the Joint Director, Local Fund Accounts Audit or, as the case may be, the Assistant Director, Local Fund Accounts Audit.".

Substitution of word "Director" for words "Chief Auditor" in Bom. XXV of 1930.

7. Throughout the principal Act, including the marginal note, for the words "Chief Auditor" and "Chief Auditor's", wherever they occur, the words "Director" and "Director's", respectively, shall be substituted.

Amendment of section 7 of Bom. XXV of 1930.

8. In section 7 of the principal Act, in sub-section (*1*), for the words "one hundred rupees" the words "twenty-five thousand rupees" shall be substituted.

Amendment of section 9 of Bom. XXV of 1930.

9. In section 9 of the principal Act,—

(*a*) for the words "The Chief Auditor shall include in his report a statement of—", the following shall be substituted, namely :—

"The Director shall include in his report a statement of—

Part I-Serious Irregularities—";

(*b*) in clause (*b*), after the words "misconduct of any person" the words "irregularity in awarding contracts, decisions causing to revenue loss and financial losses caused by policy decisions" shall be added ;

(*c*) after clause (*c*), the following words and letters shall be inserted, namely :—

"Part II-Other Irregularities—".

Amendment of section 10 of Bom. XXV of 1930.

10. In section 10 of the principal Act, in sub-section (3), in the second proviso, for clauses (*i*) and (*ii*), the following clauses shall be substituted, namely :—

"(*i*) does not exceed five hundred rupees, the Joint Director, Local Fund Accounts Audit or the Assistant Director, Local fund Accounts Audit ;

(*ii*) does not exceed one thousand rupees, the Director, Local Fund Accounts Audit,

may, if he considers that it ought to be condoned, condone such defect or irregularity. On such condonation, however, the officer concerned shall make a note to that effect in his report.".

Amendment of section 11 of Bom. XXV of 1930.

11. In section 11 of the principal Act, in sub-section (4), after the words "other officer, as the case may be," the following words shall be added, namely :—

"The Commissioner shall complete the above procedure within six months from the date of receipt of the proposal.".

STATEMENT

In the Bombay Local Fund Audit Act, 1930 (Bom. XXV of 1930), as per the recommendation of the 13th Finance Commission Report the necessary amendments are proposed, as follows—

(*a*) to change the short title of the Act as "the Maharashtra Local Fund Audit Act";

(*b*) to provide that, audit of the account of the Urban Local Bodies shall be made by the Director, Local Fund Accounts Audit;

(*c*) to change the designation of the "Chief Auditor, Local Fund Accounts", as the "Director, Local Fund Accounts Audit";

(*d*) to increase the amount of penalty under section 7 of the Act from one hundred rupees to twenty-five thousand rupees;

(*e*) to amend section 9 of the Act, so as to provide that, the Director, shall include in his report, the statement of irregularities.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930 (Bom. XXV of 1930), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 9th March 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५९]     गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२  [पृष्ठे ५, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. V of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

[Translation in English of the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. V of 2011), published under the authority of the Governor].

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th March 2011.

MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2011.

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930, for the purposes hereinafter appearing ;

Bom. XXV of 1930.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of Article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :--

Short title, and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Bombay Local Fund Audit (Amendment) Ordinance, 2011.

(2) It shall come into force at once.

Amendment of long title of Bom. XXV of 1930.

2. In the long title of the Bombay Local Fund Audit Act, 1930 (hereinafter referred to as " the principal Act "), the words " except Greater Bombay " shall be deleted. Bom. XXV of 1930.

Amendment of preamble of Bom. XXV of 1930.

3. In the preamble of the principal Act, the words ", except Greater Bombay " shall be deleted.

Amendment of section 1 of Bom. XXV of 1930.

4. In section 1 of the principal Act, for the words and figures " Bombay Local Fund Audit Act, 1930 " the words " Maharashtra Local Fund Audit Act " shall be substituted.

Amendment of section 2 of Bom. XXV of 1930.

5. In section 2 of the principal Act, the words ", except Greater Bombay " shall be deleted.

Amendment of section 3 of Bom. XXV of 1930.

6. In section 3 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*1*),—

(*i*) in clause (*a*), for the words " Chief Auditor " the word " Director " shall be substituted ;

(*ii*) in clause (*aa*), for the words " the Municipal Corporation of the City of Nagpur, the Municipal Commissioner for that City, " the following shall be substituted, namely :—

" a Municipal Corporation the Municipal Commissioner of the concerned Corporation, and in case of the Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships constituted under the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, the Chief Officer of the respective Municipal Council or *Nagar Panchayats* as the case may be, and in respect of the Industrial Townships, the Chief Executive Officer of the respective Industrial Township,"; Mah. XL of 1965.

(*iii*) for clause (*aaa*), the following clause shall be substituted, namely :—

"(*aaa*) "Director" means the Director, Local Fund Accounts Audit and includes the Joint Director, Local Fund Accounts Audit, the Deputy Director, Local Fund Accounts Audit and the Assistant Director, Local Fund Accounts Audit ;";

(*b*) in sub-section (*2*), for the words, "Chief Auditor, Local Fund Accounts or, as the case may be, the Deputy Chief Auditor, Local Fund Accounts", the following words shall be substituted, namely :—

"Director, Local Fund Accounts Audit, the Joint Director, Local Fund Accounts Audit or, as the case may be, the Assistant Director, Local Fund Accounts Audit.".

**Substitution of word "Director" for words "Chief Auditor" in Bom. XXV of 1930.**

7. Throughout the principal Act, including the marginal note, for the words "Chief Auditor" and "Chief Auditor's", wherever they occur, the words "Director" and "Director's", respectively, shall be substituted.

**Amendment of section 7 of Bom. XXV of 1930.**

8. In section 7 of the principal Act, in sub-section (*1*), for the words "one hundred rupees" the words "twenty-five thousand rupees" shall be substituted.

**Amendment of section 9 of Bom. XXV of 1930.**

9. In section 9 of the principal Act,—

(*a*) for the words "The Chief Auditor shall include in his report a statement of—", the following shall be substituted, namely :—

"The Director shall include in his report a statement of—

Part I-Serious Irregularities—";

(*b*) in clause (*b*), after the words "misconduct of any person" the words "irregularity in awarding contracts, decisions causing to revenue loss and financial losses caused by policy decisions" shall be added ;

(*c*) after clause (*c*), the following words and letters shall be inserted, namely :—

"Part II-Other Irregularities—".

**Amendment of section 10 of Bom. XXV of 1930.**

10. In section 10 of the principal Act, in sub-section (*3*), in the second proviso, for clauses (*i*) and (*ii*), the following clauses shall be substituted, namely :—

"(*i*) does not exceed five hundred rupees, the Joint Director, Local Fund Accounts Audit or the Assistant Director, Local fund Accounts Audit ;

(*ii*) does not exceed one thousand rupees, the Director, Local Fund Accounts Audit,

may, if he considers that it ought to be condoned, condone such defect or irregularity. On such condonation, however, the officer concerned shall make a note to that effect in his report.".

Amendment of section 11 of Bom. XXV of 1930.

11. In section 11 of the principal Act, in sub-section (4), after the words "other officer, as the case may be," the following words shall be added, namely :—

"The Commissioner shall complete the above procedure within six months from the date of receipt of the proposal.".

STATEMENT

In the Bombay Local Fund Audit Act, 1930 (Bom. XXV of 1930), as per the recommendation of the 13th Finance Commission Report the necessary amendments are proposed, as follows—

(*a*) to change the short title of the Act as "the Maharashtra Local Fund Audit Act";

(*b*) to provide that, audit of the account of the Urban Local Bodies shall be made by the Director, Local Fund Accounts Audit;

(*c*) to change the designation of the "Chief Auditor, Local Fund Accounts", as the "Director, Local Fund Accounts Audit";

(*d*) to increase the amount of penalty under section 7 of the Act from one hundred rupees to twenty-five thousand rupees;

(*e*) to amend section 9 of the Act, so as to provide that, the Director, shall include in his report, the statement of irregularities.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Local Fund Audit Act, 1930 (Bom. XXV of 1930), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 9th March 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

18

२१/५

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४५] शनिवार, मार्च १२, २०११/फाल्गुन २१, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १७

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण क्रमांक ९, भाग चार, दिनांक १० मार्च २०११ मध्ये, पृष्ठ क्रमांक १ ते ५ वर प्रकाशित करण्यात आलेल्या, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५) मध्ये,—

(१) पृष्ठ क्रमांक २ वर,—

(क) ओळ क्रमांक ८ मध्ये " शिर्षकामधील " या ऐवजी " शीर्षकामधील " असे वाचावे ;

(ख) कलम २ च्या समासटिपेमध्ये " शिर्षकाची " या ऐवजी " शीर्षकाची " असे वाचावे ;

(ग) ओळ क्रमांक १३ मध्ये " मजकूराऐवजी " या ऐवजी " मजकुराऐवजी " असे वाचावे ;

(घ) ओळ क्रमांक १९ मध्ये " (अअ) " या ऐवजी " (अ) " असे वाचावे ;

(ङ) ओळ क्रमांक २१ मध्ये " (अ) " या ऐवजी " (अअ) " असे वाचावे ;

(२) पृष्ठ क्रमांक ३ वर,—

(क) ओळ क्रमांक ४ मध्ये " सहाय्यक " या ऐवजी " सहायक " असे वाचावे ;

(ख) ओळ क्रमांक ६ मध्ये " यथास्थिती " या ऐवजी " यथास्थिति " असे वाचावे ;

(ग) ओळ क्रमांक ८ मध्ये " यथास्थिती, सहाय्यक " या ऐवजी " यथास्थिति, सहायक " असे वाचावे ;

(घ) ओळ क्रमांक २९ मध्ये " सहाय्यक " या ऐवजी " सहायक " असे वाचावे ;

(३) पृष्ठ क्रमांक ४ वर, ओळ क्रमांक ७ मध्ये " पाहिजे या मजकुरानंतर " या ऐवजी " पाहिजे." या मजकुरानंतर" असे वाचावे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/35550

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३(३)] रविवार, एप्रिल ३, २०११/चैत्र १३, शके १९३३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक २३

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.**— मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | १-४ |

दिनांक १ एप्रिल २०११ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३ एप्रिल २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९३० चा मुंबई २५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ;

२०११ चा महा. अध्या. ५. आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १० मार्च २०११ रोजी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १० मार्च २०११ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या पूर्ण शीर्षकाची सुधारणा.

२. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या पूर्ण शीर्षकामधील "बृहन्मुंबई व्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल. १९३० चा मुंबई २५.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या हेतु वाक्याची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या हेतु वाक्यामधील "बृहन्मुंबई व्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १ मधील, "मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मधील "बृहन्मुंबई व्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, "मुख्य लेखापरीक्षक" या मजकुराऐवजी "संचालक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (अअ) मध्ये, "नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत त्या शहराचा नगरपालिका आयुक्त," या मजकुराऐवजी, "महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींच्या बाबतीत, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ या अन्वये घटित झालेल्या संबंधित नगरपरिषदा किंवा यथास्थिति, नगरपंचायतींचा मुख्य अधिकारी आणि औद्योगिक नगरींच्या बाबतीत संबंधित औद्योगिक नगरीचा मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; १९६५ चा महा. ४०.

(तीन) खंड (अअअ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(अअअ) "संचालक" म्हणजे संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा असा असून त्यात सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, उप संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा आणि सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांचा समावेश होतो ;";

(ख) पोट-कलम (२) मधील, "मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा किंवा यथास्थिति उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा" या मजकुराऐवजी "संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा किंवा यथास्थिति, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ मध्ये "मुख्य लेखापरीक्षक" या मजकुराऐवजी "संचालक" हा मजकूर दाखल करणे.

७. संपूर्ण मुख्य अधिनियमामध्ये, समासटीपेसह "मुख्य लेखापरीक्षक" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल, त्या त्या ठिकाणी, "संचालक" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "शंभर रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी "पंचवीस हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(क) "मुख्य लेखापरीक्षकाने आपल्या अहवालात पुढील गोष्टीसंबंधीचे एक विवरणपत्र समाविष्ट केले पाहिजे.—" या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"संचालकाने आपल्या अहवालात पुढील गोष्टींसंबंधीचे एक विवरणपत्र समाविष्ट केले पाहिजे—

भाग-१-गंभीर अनियमितता- ";

(ख) खंड (ब) मध्ये, "किंवा नुकसानीची रक्कम" या मजकुरानंतर, ",कंत्राट देण्यामध्ये झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयांमुळे झालेले आर्थिक नुकसान" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (क) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"भाग-२-इतर अनियमितता- ".

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १० ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील पोट-कलम (३) च्या दुसऱ्या परंतुकातील खंड (एक) आणि (दोन) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(एक) पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल तर सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा किंवा सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यास ;

(दोन) एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांस,

असा दोष किंवा नियमबाह्य गोष्ट क्षमापित करणे आवश्यक आहे असे वाटल्यास ती क्षमापित करता येईल. तथापि, अशा क्षमापनानंतर, संबंधित अधिकाऱ्याने आपल्या अहवालामध्ये तशा आशयाची नोंद केली पाहीजे. ".

सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) मध्ये, " इतर अधिकाऱ्यास कळविले पाहिजे. " या मजकुरानंतर " उपरोक्त कार्यवाही, आयुक्त प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यात पूर्ण करील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

१२. (१) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०११ चा महा. अध्या. ५.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना वा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.